# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 220/2022 दिनांक : 31.05.2022

## 1)खुनाचा प्रयत्न :—

**शिवाजीनगर :—**दिनांक 30.05.2022 रोजी चे 15.45 वा. चे सुमारास, **मा. डी.पी. सावंत यांचे घरी शिवाजीनगर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन मा. सावंत साहेब यांचे घरात प्रवेश करुन घराचे किचनमध्ये जाऊन फिर्यादीच्या डोक्यास नकली बंदूक लावून मा. सावंत साहेबाकडे चल नाहीतर तुला गोळी मारतो असे म्हणुन फिर्यादी सोबत झटापट केली व फिर्यादीच्या डोक्यात त्या बंदूकीचे मागचे बाजुने जिवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण करुन दुखापत केली व खुन करण्याचा प्रयत्न केला. मा. सावंत साहेब आले असता त्यांना 50,000/— रुपये दया व माझे काम करा नाहीतर तूम्हाला गोळी मारतो असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सुभाष चांदू पवार, वय 36 वर्षे, व्यवसाय नौकर रा. आंतरगाव ता. नायगाव जि. नांदेड ह.मु. आर्शिवाद नगर नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 204/2022 कलम 307,384,386,452,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री माने, मो. नं. 9403546846** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :—

**लोहा :—** दिनांक 29.05.2022 रोजी 23.30 वा. ते दिनांक 30.05.2022 रोजी 02.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे व त्याच्या शेजारी राहते घरी मौजे धावरी ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीच्या मुख्य दरवाज्याचे कडी कोंडा व कुलूप तोडून आत प्रवेश करुन घरातील कपाटाचे कुलूप तोडून कपाटातील सोन्याचे,चांदीचे दागिने व नगदी असा एकुण किंमती 2,88,100/— रुपयाचा ऐवज व फिर्यादीच्या शेजारील घराचे दरवाजाची कडी कोंडा व कुलूप तोडुन आत प्रवेश करुन घरातील सोन्या,चांदीचे दागीने व नगदी असा एकुण किमती 1,54,650/— /रुपयाचा ऐवज व सर्व मिळुन किंमती 4,42,750/— रुपयाचा ऐवज कोणतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी अंकुश देवराव वाकडे वय 25 वर्षे, व्यवसाय चालक रा. धावरी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 119/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सोनकांबळे, मो.क्र. 9823867336** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :—

**1)धर्माबाद :—** दिनांक 24.05.2022 रोजी 09.00 वा. चे सुमारास, **मौजे बाळापुर शिवाराचे धुऱ्यावरुन ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मो.सा. क्रं. एमएच—26/बीके—5229 किमती 35,000/—रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी शामराव गंगन्ना वरणे वय 45 वर्षे व्यवसाय शेती रा. बाळापुर ता. धर्माबाद जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 135/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री मसलेकर, मो.क्र. 9370467775** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :—** दिनांक 26.05.2022 रोजी 15.30 वा. ते 16.30 वा. चे दरम्यान, **औदयोगिक फॅब्रीकेशन च्या बाजुस शिवाजीनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो मेइस्ट्रो मो.सा. क्रं. एमएच—26/एयु—0995 किमती 35,000/—रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी धवल रविंद्र लोखंडे वय 26 वर्षे रा. शिवजीनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 203/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2141 मोरे, मो.क्र. 8208262971** हे करीत आहेत.

## 4)मोबाईल चोरी :—

**1)कंधार :—** दिनांक 30.05.2022 रोजी 16.00 वा. सुमारास, **कंधार येथील कोषागार कार्यालयाच्या बाजुला रस्त्यावर, ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे आठवडी बाजार करण्यासाठी व मसाले खरेदी करण्यासाठी गेला असता गर्दीचा फायदा घेवून शर्टच्या खिशातील रेडमी पॉवर कंपनीचा मोबाईल किंमत 6000/— रुपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी संदीप मारोती जाधव वय 46 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. सोनमळ तांडा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 173/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री गणाचार्य, मो.क्र. 9420841070** हे करीत आहेत.

**2)बिलोली :–** दिनांक 30.05.2022 रोजी 14.00 वा. ते 15.00 वा. दरम्यान, **मौजे हिप्परगा थडी मन्याड नदीकाठी, ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा उन्हाळयाचे दिवस असल्याने मन्याड नदी चे किनाऱ्यावर हिप्परगा थडी शिवारात पॅन्टचे खिशात ठेवून पोहला व येवुन पाहीला असता रेडमी नोट 5 एमआय कंपनीचा मोबाईल किंमत 7000/– रुपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सय्यद मुनीर सय्यद कासीम वय 53 वर्षे, व्यवसाय निवृत्त अधिकारी रा. अटकळी ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 128/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2049 आंबेवार, मो.क्र. 7744867446** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 28.05.2022 रोजी 08.30 वा. चे सुमारास, **प्लॉट क्रं. 264 मधील वादग्रस्त प्लॉट कांकाडी ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद 17 आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी चा भाऊ,आई,वडील व पत्नी यांना लोखंडी रॉडने,फावडयाने, काठीने डोक्यात,पाठीवर, मारुन गंभीर जखमी केले व फॅक्चर केले व अश्लिल शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी साईनाथ सदाशिव बागल वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. काकांडी ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 321/2022 कलम 326,325,324,323,143,147,148,149,294, 504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री कासले, मो. नं. 9823017330** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**इतवारा :–** दिनांक 27.06.2021 ते दिनांक 16.01.2022 रोजी पावेतो, **फिर्यादीचे सासरी अंबड ता. अंबड जि. जालना ह.मु. गाडीपुरा बडी दर्गा, नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस माहेरहुन 5,00,000/–रुपये घेवुन ये म्हणुन तिला मारहाण करुन उपाशी पोटी ठेवून तीचा शारिरीक व माणसीक छळ करुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 19 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 128/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री सय्यद मुनीर**, **मोक्र. 9923697166** हे करीत आहेत.

## 7)पळवुन नेले :–

**शिवाजीनगर :–** दिनांक 29.05.2022 रोजी चे 14.00 वा. ते 14.30 वा. चे दरम्यान, **दत्त मंदीर ते आनंद नगर जाणारे रोडवर,नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **मुलगा नामे ज्ञारेश्वर दत्तात्रय जाधव वय 16 वर्ष 10 महिने व्यवयाय शिक्षण** हा पेन खरेदी करणेसाठी गेला असता तो अदयाप पावेतो परत आला नाही नातेवाईकाकडे व मित्रांकडे शोध घेतला असता मिळुन आला नाही. त्यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी पळवुन नेले आहे. वगैरे **फिर्यादी दत्तात्रय शिवराम जाधव, वय 45 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. बळेगाव ता. वसमत जि. हिंगोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 202/2022 कलम 363 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री घुगे**, **मो.क्रं. 9822720567** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

**मुदखेड :–** दिनांक 30.05.2022 रोजी चे 15.00 वा. चे सुमारास, **रेल्वेगेट चे अलीकडे मच्छी मार्केट समोर मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 7260/–रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री दशरथ गोविंदराव तलेदवार, ने. उपविभाग नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 119/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1585 गीते**, **मो.क्र. 8329115398** हे करीत आहेत.

## 9)प्रोव्हिबीशन :–

**1)धर्माबाद :–** दिनांक 30.05.2022 रोजी 20.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे राहते घराचे समोर मोकळया जागेत शांतीनगर धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या सिंधी एकुण किंमती 2000/–रुपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेली मिळुन आली. वगैरे **फिर्यादी मपोकॉ/3267 रेखा माधवराव इंगळे, ने. पोस्टे धर्माबाद,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 137/2022 कलम 65(ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कारामुंगे, मो.क्र. 9823184089** हे करीत आहेत.

**2)मुखेड :–** दिनांक 30.05.2022 रोजी 19.30 वा. चे सुमारास, **लोखंडे चौक कवठा रोडवर ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्रा एकुण किंमती 1440/–रुपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री गजानन दत्ता काळे, ने. पोस्टे मुखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 166/2022 कलम 65(ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1793 राठोड, मो.क्र. 8805957400** हे करीत आहेत.

**3)बिलोली :—** दिनांक 30.05.2022 रोजी 18.20 वा. चे सुमारास, **मौजे सावळी आरोपीचे घरासमोर ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या सिंधी एकुण किंमती 1500/—रुपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोका/142 भारत खंडु फंताडे, ने. पोस्टे बिलोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 127/2022 कलम 65(ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1985 शिंदे, मो.क्र. 7721005064** हे करीत आहेत.

**4)विमानतळ :—** दिनांक 30.05.2022 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **श्रीराम नगर, हनुमानगड रोड नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्रा एकुण किंमती 3000/—रुपयाची व विदेशी दारु 1600/— रुपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्कुटी नंबर नसलेली किंमती अं. 40,000/— वर घेवून जात असताना ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोका/67 ज्ञानेश्वर भगवानराव भिसे, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 188/2022 कलम 65(ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/967 गायकवाड, मो.क्र. 9529796606** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 221 / 2022 दिनांक : 31.05.2022

## पोलीस अधिक्षक कार्यालयात " अहिल्यादेवी होळकर " यांची जयंती साजरी

31 मे 2022 रोजी मंगळवार **"अहिल्यादेवी होळकर"** यांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली आहे. या प्रसंगी **मा. श्री प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांचे हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले आहे. या प्रसंगी **मा. डॉ. अश्विनी जगताप,** पोलीस उपअधिक्षक मुख्यालय नांदेड तसेच **श्री व्दारकादास चिखलीकर**, पोनि स्थागुशा, **श्री जि.डी. सैदाने,** पोनि, **श्री ए.ए. अनंत्रे,** पोनि, पोलीस नियंत्रण कक्ष, **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, **श्री ए.ए. पल्लेवाड**, सपोनि, **श्रीमती एम.यु. भोसले**, पोउपनि, **श्री जसपालसिंघ कोटतिर्थवाले**, पोउपनि, पोलीस नियंत्रण कक्ष, **श्री चंद्रकांत जाधव,** कार्यालयीन अधिक्षक व ईतर शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन सपोउपनि उत्तम वाघमारे, पोना संजय सांगवीकर, पोकॉ विनोद भंडारे यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड



# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 222/2022 दिनांक : 31.05.2022**

**पोलीस अधिक्षक मा. श्री प्रमोद शेवाळे साहेबांनी घेतली जागतिक तंबाखू विरोधी दिनाची शपथ**

आज दिनांक 31 मे 2022 रोजी 11.00 वा. चे सुमारास पोलीस अधिक्षक कार्यालयात **पोलीस अधिक्षक मा. श्री प्रमोद शेवाळे साहेबांनी जागतिक तंबाखू विरोधी दिन** असल्यामुळे शपथेचे वाचन केले. तसेच इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पण पाठोपाठ शपथेचे वाचन केले. "**तंबाखू,जर्दा,खर्रा तसेच बिडी, सिगारेट,ई–हुक्का, ई–सिगारेट, व सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यामुळे होणारे आजार यांच्या दुष्परीणामांची मला जाणीव आहे. म्हणुन मी जन्मभर, या व्यसनांपासुन, दूर राहण्याचा संकल्प करीत आहे. माझे कार्यालय,माझे घर, आणि माझा परिसर तंबाखूमुक्त रहावा, तसेच इतरांनी तंबाखूजन्य पदर्थाचा परित्याग करावा व थुंकदानीचा वापर करावा यासाठी मी प्रयत्न करेन. भारत सरकारचा, तंबाखू नियंत्रण कायदा 2003 तसेच महाराष्ट्र शासनाचा तंबाखूजन्य पदार्थ यांचे सेवन, थुंकण्यास व धुम्रपानास प्रतिबंध या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी मी सतत प्रयत्नशील राहीन माझ्या अधिपत्याखालील व जिल्हयातील सर्व आरोग्य संस्था, शैक्षणिक संस्था व शासकीय कार्यालये तंबाखूमुक्त, व ई–सिगारेट मुक्त करेन. मी,माझे कार्यालय, माझे घर, माझे गाव, माझी शाळा, माझी संस्था आणि, माझे महाराष्ट्र राज्य तंबाखुमुक्त करण्याचा प्रयत्न करेन**" अशा प्रकारची शपथ घेण्यात आली.

या प्रसंगी **मा. डॉ. अश्विनी जगताप,** पोलीस उपअधिक्षक मुख्यालय नांदेड तसेच **श्री व्दारकादास चिखलीकर**, पोनि स्थागुशा, **श्री जि.डी. सैदाने,** पोनि, **श्री ए.ए. अनंत्रे,** पोनि, पोलीस नियंत्रण कक्ष, **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, **श्री ए.ए. पल्लेवाड**, सपोनि, **श्रीमती एम.यु. भोसले**, पोउपनि, **श्री जसपालसिंघ कोटतिर्थवाले**, पोउपनि, पोलीस नियंत्रण कक्ष, **श्री चंद्रकांत जाधव,** कार्यालयीन अधिक्षक व ईतर शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार कर्मचारी मोठया संख्येने हजर होते.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड



